दिनांक ०९/०१/२०२४

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०८/०१/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

## दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | पोस्टे वलगाव अपक्र. 08/2024 कलम 324,504 भादवि | स्वराज शोरुम च्या समोर वलगाव | दि.08/01/2024 चे18/30 वा<br><br>दि.08/01-2024 चे 21/39 वा. | राजेंद्र सदाशिव राव लोणारे वय 60 वर्ष व्यवसाय – माजी सैनिक रा. अशोक नगर वलगांव ता. जि.अमरावती | योगेश नरेश मानवटकर वय 32 वर्ष रा.वलगाव ता. जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि,. आज दि.08/01/2024 रोजी संध्या. 06.30 वा. दरम्यान मी माझे माझे मोटार सायकलने अमरावती येथे जात होतो. मी अमरावती येथे जात असतांना स्वराज शोरूम चे समोर, गडलीग यांचे घरा ज वड योगेश मानवत कर हा समोरून त्याची मोटार कार ने आला. तोतेथे त्याची कार पार्क करीत होता. तेव्हा त्याची कार ही माझे अंगावर आली. म्हणून मी त्याला म्हटले की गाडी माझे अंगावर का आनतो तर त्याने मला म्हटले की तुला दिसत नाही काय, थांब रे तिथे असे म्हनाला, म्हणून मी थांबलो. तो त्याची गाडी पार्क करून माझे अंगावल आलो. त्याने माझे शर्टाची कॉलर पकडून मला ओडता ड केली. खालचा दगड उचलून माझे डोक्या व रडाव्याबाजूला मारला. त्यामुळे माझे डोके फुटले व रक्त निघू लागलो. त्याने मला शिवीगाळ सुध्दा केली. त्याचे सोबत आदित्य शेंडे नावाचा मुलगा होता. तो त्याला तेथून घेवून गेला. ही घटना घडली तेव्हा तेथे अनिल उगले, पंजाब गडलींग, हिरालाल ग़डलींग व मोहल्यातील इतर लोक हजर होते. त्यांनी भांडन सोडवून मला वाचवीले. योगेश मानवतकर याला मी माझे अंगावर गाडी का आनतो ? असे म्हटले असता त्याने मा झे सोबत हुज्जत करून मला शिवीगाळ केली व माझे डोक्यावर गोटा मारून माझे डोके फोडू न मला जखमी केले. म्हणून त्याचे वरकार्यवाही होण्याकरिता रिपोर्ट देत आहे..अशा फिर्यादि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## पळवुन नेणे

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा अप नं. १०/२०२४ कलम ३६३ भादवी | अमरावती | घ ता वेळ - दि. ०८/१/२०२४चे ११/०० वा दि ०८/०१/२४ चे २०.४० | एक महीला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि. ०८/१/२४ रोजी सकाळी ०७.०० वा दरम्यान बाहेर गेल्यावर दुपारी ०२.०० वा दरम्यान घरी परत आल्या तेव्हा त्यांना नातेवाईक घरी दिसुन आली नाही त्यांना त्यांचे नातेवाईकांनी सांगितले की सकाळी ११/०० वा पासुन घरुन गेली अद्याप पर्यत घरी परत आली नाही तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | पोस्टे खो गेट अप.नं 6/2024 कलम 363 भादवि | अमरावती | 7/1/2024 रोजी 6/30 वा ते दि 08/1/2024 चे 16/28वा. | एक महीला | अज्ञात | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हि कामावरुन गेली असता त्यांची नातेवाईक हि नमुद घटना ता वेळी व ठिकाणी मैत्रीणी कडे जाते असे शेजारी यांना सांगुन घरुन निघुन गेली व तिचा मोबाईल क्रमांक वर संपर्क केला असता बंद दाखवित असुन तिला कोणीतरी अज्ञात वक्तीने फुसलावुण पळुन नेले वरुन फिचे जबानी रि.वरुन सदर चा गुन्हा दाखल |

## स्त्रिअत्याचार

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | राजापेठ अप क्र २२ /२०२४ कलम ३७६(२)(एन), ४१७ भा.द.वी. | अमरावती | घ.ता.वेळ - दि. ०१/०१/२०२१ चे ००/०० वा ते ०७/०१/२०२४ चे १३/०० वा दाखल ता वेळ दि ०८/०१/२०२४ चे २३/२१ वा | एक महीला | आकाश तंतरपाळे रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फी र्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहणारे असुन यातील आरोपी याने फिर्यादीला लग्नाचे आणीष दाखवुन वारंवार शारीरीक संबंध स्थापीत केले व आरोपी याने फिर्यादी सोबत लग्नाला नकार देवुन लग्नाचे आमिष देवुन बलात्कार केला व फि ची फसवणुक केली अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## आत्महत्तेस प्रवृत्त करणे

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | बडनेरा अप नं. ११/२४ कलम ३०६, ३४ भादवी | मृतकाचे घर शिवाजी नगर ग्राम परलाम ता भातकुली अमरावती | घ ता वेळ दि. ३०/१२/२०२३ चे ०९.३० वा दा ता वेळ दि. ८/१/२४ चे २२.४३ वा | सुधीर सुधाकराव घोंगडे वय ४२ वर्ष रा ग्राम परलाम ता भातकुली जी अमरावती | १-नितीन यादवराव अढाऊवय ४८ वर्ष २-अनिल यादवराव अढाऊ वय ५० वर्ष दोन्ही ग्राम परलाम | हकीकत अशा प्रकारे आहे की, मृतक सचिन घोगंडे याचे शेजारी राहानारी नातेवाईक हिचे सोबत सम २०१२ पासुन प्रेम संबध होते त्याबाबत मृतक याचे आई वडीलांनी लग्नाची बोलनी सुध्दा झाली होती परंतू मृतकाचे शेजारी राहानारा नातेवाईक याने घराचे बांधकाम केले व जाण्यायेण्याचे रस्त्यामधुन संडास चा पाईप टाकला त्यामुळे त्याचे सोबत शाब्दीक वाद झाला व मृतकाचे लग्न होवु नये म्हणुन नातेवाईकाचे आई वडीलांचे मन परिवर्तन केले व नातेवाईकाचे लग्न दि. ३१/१२/२०२३ रोजी ठरविले त्यामुळे मृतक हताश झाला. आरोपीतांनी प्रताडीत करुन मृतकाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | पो स्टे गाडगे नगर अम शह अप क्र ४१/२०२ कलम ३८० भादवी | महर्षी स्कुल राजपुर धाबा चौक अमरावती | घतावेळ ०८.०१.२०२४चे ०९.०० वा ते १२.००वा दातावेळ ०८.०१.२०२४ चे १८.३२ वा | नितीन भुजंगराव ठाकरे वय ४८ वर्ष रा वैभव कॉलणी गौंडबाबा मंदीर जवळ दस्तूर नगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी यांनी त्यांचे मुलीला मोबाईल सॅमसंग स्मार्ट फोन M ३१ (BLUE,६/१२८) IMI ३५२६९११८२९९५२३३ किं.अं. १०,०००/- रु चा घेवून दिला होता मीची मुलगी शाळेत घेवू गेला असता तिने बॅगमध्ये महर्षी पब्लीक कॉलेज मधील नवीन बिल्डींग रुग क्र १३४ मध्ये बॅग मध्ये ठेवला हेता व केमेस्ट्री प्रॅकटीकल करायला गेली व दुपारी १२.०० वा चे सुमारास परत अलाी असता तिला बॅगमध्ये मोबाईल दिसला नाही . कुणीतरी अज्ञात इसमाने फीचे मुलीचे बॅगमधून मोबाईल चोरुन नेला.अशा फीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन नागपुरी गेटअप क्र ०६/२०२४ कलम ४५२, ४५४, ३४ भादवि | अमरावती | गुन्हा घटणा ता. वेळ् दि ०८/०१/२० २४ चे १५/०० वा दरम्याण दाखल ता.वेळ् दि.०८/०१/ २०२४ चे २२/५८ वा | एक महीला | १)शेख हनिफ शेख अजीज २)शेख साबीर शेख अजीज ३)शेख जाबीर शेख अजीज ४)शेख हसन सर्व रा. अचलपुर जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे.की यातील फिर्यादी व आरोपी हे नातेवाईक असुन फिर्यादी राहत असलेले घर हे आरोपी क्र, १)शेख हनिफ शेख अजीज याचे नावे असुन सन २००९ मध्ये फिर्यादीला घर राहायला दिले होते घराच्या हिस्साच्या कारणा वरुन आरोपी हे फिर्यादी सोबत भांडण केले नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी आरोपी हे फिर्यादी च्या घरी आले तेव्हा फिर्यादीचे पती घरी होते आरोपी यांनी फिर्यादीस म्हटले की तु आमचे घरुन तुझ्या मुला सोबत नातेवाईक निघुन जा असे म्हणुन शिवीगाळ करुन अंगावर मारण्यास आले फिर्यादीच्या नातेवाईकास समजाविले असता तेथुन निघुन गेले फिर्यादी ही झालेली घटने बाबत पोलीस स्टेशनला त्यांचा रिपोर्ट देणे करीता घराला कुलुप लावुन आली असता फिर्यादीला फोन करुन फिर्यादीच्या मुलाने शाकीन खान याने सांगीतले की घराचे कुलुप तुडलेले आहे व घरात फिर्यादीचे भाउ (आरोपी) १)शेख हनिफ शेख अजीज २)शेख साबीर शेख अजीज ३)शेख जाबीर शेख अजीज ४)शेख हसन सर्व रा. अचलपुर जि. अमरावती हे घराचे आत आहे. त्यांनी संगनमत करुन आम्हाला घरातुन काढण्यासाठी फिर्यादीच्या घरी येवुन शिवीगाळ करुन मारण्या करीता अंगावर येवुन फिर्यादीच्या घराचे कुलुप तोडुन घरात घुसले अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे फ्रेजरपुरा, अमरावती शहर अप .क्र १३/२०२४ कलम ३७९ भादवि | अमरावती. | दि.३१.१२. २०२३ चे १६.०० ते १८.३० वा. दरम्यान. दाखल - दि. ०८.०१.२० २४ चे १७.०३ वा. | एक महीला | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादीच्या मुलाची सायकल ninty one warhorse २६ T सायकल fr No Ro६९४०९ कंपनीची कि. अं. ३०००/- रु. घराच्या गेट समोर लावलेली नमुद घटना ता वेळ व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरुन नेली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो स्टे गाडगे नगर अम शह अप क्र ४०/२०२ कलम ३७९ भादवी | जिल्हा स्टेडीयम अमरावती | घतावेळ ०८.०१.२०२४ चे १०.०० वा ते १४.३० वा दातावेळ ०८.०१.२०२४ चे १७.४१ वा | सैलेश नथ्थूजी बोपचे वय ४७ वर्ष रा सबनिस प्लॉट अमरावती | एक अनोळखी इसम डोक्यात काळ्या रंगाची टोपी काळ्या रंगाची टी शर्ट, पांढ-या रंगाची लोअर घातलेली | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी यांनी त्यांचे मुलाला शाळेत जाण्याकरीता व इतर कामाकरीता एक टरबाईन स्वाट कंपनीची मिलट्री रंगाची फ्रेम क्रमांक JK२२७३३२३ ची सायकल कीं अं ९,५००/- रु ची विकत घेवून दिली होती. सदर सायकल फी चा मुलगा क्रिकेट खेळण्याकरीता दि ०८.०१.२०२४ रोजी १० वा घेवून गेला जिल्हा स्टेडीयम अमरावती आवारात पार्क केली व क्रिकेट संपल्यानंतर फीचा मुलगा सायकल पार्क केलेल्या ठीकाणी गेला सायकल मिळून आली नाही. सायकलचा शोध घेतला असता सीसीटीव्ही फुटेज मध्ये एक अनोळखी इसम डोक्यात काळ्या रंगाची टोपी काळ्या रंगाची टी शर्ट, पांढ-या रंगाची लोअर घातलेला मुलगा सायकल घेवून जाताना दिसत आहे. अशा फीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## जुगार

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे नागपुरी गेट अमरावती शहर | अप क्र ०५/२०२३ कलम १२(अ) म. जु. का | लालखडी मैदान पन्नीपुरा अमरावती | दि.०८/०१/२०२३ चे २०/३० वा ते २१/३० वा | दि.०८/०१/२०२३ चे २२/२५ वा | सपोनि संदिप हिवाळे पोलीस स्टेशन नागपुरी गेट अमरावती शहर | गफ्फुर शाह रहेमान शाह वय ६५ वर्ष रा. गणोजा देवी ता.भातकुली अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी स्टॉप सह नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी यातील आरोपीवर मिळालेल्या माहीती वरुन जुगार रेड केली असता तिथे नमुद आरोपी हा वरली मटक्याच्या जुगारखेळ पैसे लावुन खेळत असतांना मिळुन आला त्याला जागीच पकडले त्याचे जवळुन१)नगदी ४१०/- रु एक बॉलपेन कि. अ. ०५/-रु दोन वरली मटका चिठ्ठ्या असा एकुण ४१५/- रु चा माल मिळुन आल्याने पंचासमक्ष जप्त करण्यात आला नमुद आरोपी याचे कृत्य कलम१२(अ) म. जु. का प्रमाणे होत असल्याने त्याचे वुरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | पोस्टे वलगाव | अपक्र.- 07/ 2024 कलम 12 (अ) म जु का | धनगर पुरा शिराळा | दि08/01/2024चे 19.15 वादरम्याण | दि.08/01/2024 चे 21/26 वा. | पो.उपनी गजानन बोरवार पो.स्टे वलगाव, अमरावती शहर | 1) एकनाथ हरीभाऊ गावंडे वय 52 वर्ष 2) सचिन वामनराव भोंगाडे वय 28 वर्ष दोन्ही रा. रा. शिराळा ता. जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे 08/01/2024 रोजी19/24 वा. पो.स्टेला हजर असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहीती मिळाली की, ग्राम शिराळा धनगरपुरा येथे एकनाथ गावंडे 2) सचिन भोंगाडे नावाचे ईसम लोंका कडुन पैसे घेवुन पैशाचे हारजितचा मिलन टाईम बाजार नावाचा वरली मटकाचा खेळ चालवित आहे अशा माहीती वरुन आम्ही सोबत दोन पंच व स्टॉप व पो.कॉं तौसिफ बं.नं. 197 मा. पोलिस आयुक्त साहेब अमरावती यांचे स्कॉड मधील सपोनि महेन्द्र ईंगळे वत्यांचे सोबत असलेले अधी व पोलिस अमलदार मिळालेल्या माहीती प्रमाणे शिराळ धनगर पुरा एकनाथ गावंडे यांचे घारजवळ जावुन पाहले असता लोकांची गर्दी दिसली गर्दी मध्ये दोन ईसम सिमेंटच्या ओट्यावर बसुन लोकांन कडुन पैसे घेऊन 1 ते 10 आकडे चिठ्यावर लिहुन पैशाचे हारजितीचा वरली मटका जुगार खेळ चालवितांनादिसले. खात्री पटल्याव र छापा घातला असता जुगार लावणारे लोक आम्हाला पाहुन पळुन गेले पैसे घेऊन 1 ते 10 चिठ्ठी लिहीणा-या दोन्ही ईसमांना जागीच पकडले दोन ईसमांना त्यांचे नाव गाव विचारले असता |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | त्यांनी त्यांचे नाव 1) एकनाथ हरीभाऊ गावंडे वय 52 वर्ष 2) सचिन वामनराव भोंगाडे वय 28 वर्ष दोन्ही रा. रा. शिराळा ता. जि. अमरावती असे सांगीतले पंचासमक्ष त्यांचे ताब्यातुन वरली मटका आकडेलिहीलेली 8 चिठ्ठी, नगदी 3030/- रु दोन डॉंट पेन कि. अंदाजे 20 रु दोन निळे कार्बन कि. 10 रु असा एकुन 3060/-रु चा जुगार माल मिळुन आला दोन पंचा समक्ष सविस्तर जप्ती पंचनामा करुन सदरचा जुगार मुद्देमाल जप्त करण्यात आला1) एकनाथ हरी भाऊ गावंडे वय 52 वर्ष 2) सचिन वामनराव भोंगाडे वय 28 वर्ष दोन्ही रा. शिराळा यांचे कुत्यकल म 12 (अ) म.जुगारकायदाप्रमा मे गुन्हा होतअसल्याने त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल होण्या करीता माझी कायदेशि रफिर्याद आहे अशा सरतर्फे फिर्यादी चेलेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |